महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती,जि.पुणे

## Govt.Medical college & General Hospital,Baramati,Dist. Pune

Email: deangmcbaramati@gmail.com Website:-www.gmcbaramati.org

प्लॉट नंबर १०७,एमआयडीसी,बारामती ४१३१३३

जा.क्र.शावैमबा/दरपत्रक/ऑनलाईन जाहिरात/टिपणी/ 1571 / २०२३, दिनांक 19/12/२०२३

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथील शरीरविकृतीशास्त्र विभाग यांच्याकडून आतंररुग्ण विभागातील रुग्णाच्या रक्त चाचण्या तपासणी करण्यासाठी Recorder Paper Roll अत्यंत आवश्यक असल्यामुळे मागणी केलेले आहे.

## जाहिर सुचना

इच्छुक पुरवठादारांना जाहिर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथील शरीरविकृतीशास्त्र विभागास आतंररुग्ण विभागातील रुग्णाच्या रक्त चाचण्या तपासणी करण्यासाठी Recorder Paper Roll अत्यंत गरजेची बाब म्हणून मागणी केलेले आहे.तसेच मागणी केलेल्या साहित्याची ची यादी सोबत जोडत आहे.

अटी व शर्ती:-

१. दरपत्रक सीलबंद लिफाफा दिनांक 26/12/२०२३ रोजी सांय ५.३० वाजेपर्यत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

२. इतर दरपत्रकधारक/अधिकृत विक्रेता/पुरवठादार कंपनी यांना देखील कार्यालयाच्या सुचना फलकानुसार दरपत्रक सिलबंद लिफाफा विहित मुदतीत सादर करण्याची मुभा राहिल.

३. दरपत्रक आवश्यक त्या तपशिलासह म्हणजेच पुरवठा करावयाच्या वस्तूचे नाव , लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक,दरपत्रकधारकांच्या दुकानाच्या नावाचा शिक्का,अधिष्ठाता , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती, यांचे नाव लिफाफा विहीत मुदतीत सादर करावा.

४. सिलबंद लिफाफे हे दिनांक 27/12/२०२३ रोजी दु.३.०० वाजता मा. अधिष्ठाता यांच्या कार्यालयामध्ये उघडण्यात येईल. त्याकरिता कमीत कमी तीन पुरवठादारांचे दरपत्रक प्राप्त होणे क्रमप्राप्त राहील. आपणास जर दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग घ्यावयचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

५. दरपत्रक धारकांनी दरपत्रके हे अधिकृत लेटरहेडवर शिक्यासह सादर करावे. दरपत्रक देणा-या व्यक्तीने आपले दुकानाचा परवाना, जीएसटीची प्रत, पॅनकार्डची प्रत, पुरवठादार हा संबंधित कामाबाबत म्हणजेच कंपनीचे अधिकृत विक्रेता असेल तर त्या बाबतची कागदपत्रे उत्पादक कंपनीचे ॲथेरजेशन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदर दस्तऐवज सिलबंद दरपत्रक लिफाफा सादर करतेवेळी लिफाफयात असणे गरजेचे आहे. त्याकरिता वेगळा लिफाफा देण्याची गरज नाही.

६. प्रत्येक दरपत्रकधारकास केवळ एक दरपत्रक भरता येईल.

७. सर्वात कमीत कमी दरांचे दरपत्रक व वस्तूंचा दर्जा चांगला असेल असे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येऊ नये.

Scanned with CamScanner

८. दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.फक्त एक नग प्रमाणे दर कळविण्यात यावे व जीएसटी कर स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे, साहित्य हे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात कार्यालयीन वेळेत (सुटटीचे दिवस वगळुन) पुरवठा करण्यात यावे.

९. मागणी करण्यात आलेली वस्तू/सामग्री ही विनिर्दिष्ठानुसार असणे अत्यंत आवश्यक आहे.सामुग्री ही उत्कृष्ठ दर्जाची असणे आवश्यक आहे.

१०. प्रस्तावित सामुग्री विनिर्दिष्ठानुसार असल्याबाबत संबंधीत विभागप्रमुख यांचेकडून प्रमाणित केल्यानुतरच देयकाची अदागयी करण्यात येईल.

११.सदरील कामाकरिता कोणतीही आगाऊ रक्कम (Advance Payment) अदा करण्यात येणार नाही.आपवादात्मक परिस्थितीमुळे देयक अदा करण्यास विलंबपोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही. त्या प्रकारची मागणी करता येणार नाही.अनुदान उपलब्ध नसल्यास , अनुदान उपलब्ध होणाच्या अधिन राहुन देयकाची रक्कम अदागयी येईल.

१२.दरपत्रक ग्राहयं कालावधी हा दर पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांकापासून एक वर्ष किंवा एका वस्तूची खरेदी किमंत रुपये १०.०० लाखाच्या आतच्या मर्यादित असेल.त्यानंतर आपले आपोआप रद्द होईल या करिता वेगळे आदेश काढले जाणार नाही.

१३.कोणतेही कारण न देता झालेली सर्व दरपत्रके स्विकारणे/नाकारणे तसेच उक्त नमुद कोणत्याही अटीत अंशंत: बदल करणे इ. अधिकार कार्यालय प्रमुख यांनी राखुन ठेवलेले आहेत.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ब.स.
बारामती,जि.पुणे.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बारामती,जि.पुणे
Government Medical College & General Hospital Baramati
Department of Pathology
Phone No- 02112-244172
Email id- pathgmcbaramati@gmail.com

# Recorder Specifications

| | | |
|---|---|---|
| 01 | Recorder Width | 48mm |
| 02 | Paper Width | 57.5mm |
| 03 | Paper Roll Diameter | 50mm |
| 04 | Print Speed | 12.5mm/S |

प्राध्यापक व विभागप्रमुख
शरीरविकृतीशास्त्र विभाग
पु.अ.हो.शासकीय वैद्यकीय महाविद्याल
बारामती.पुणे.

Scanned with CamScanner